# University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail - dy.registrar.tau@fort.mu.ac.in

**Teaching Appointments & Approval Section**
UNIVERSITY of MUMBAI,
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32

परिपत्रक क्र. टीएएएस/०२/२०१८-२०१९ दिनांक : २४ एप्रिल, २०१८

**विषय : आश्वासित प्रगती योजनेचे (CAS) प्रस्ताव सादर करणेबाबत.**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था,
मुंबई विद्यापीठ.

विद्यापीठाच्या उपकेंद्राचे सक्षमीकरण करण्याबाबत झालेल्या बैठकीमध्ये मा. कुलगुरू यांनी संलग्नित महाविद्यालय, शिक्षक तसेच विद्यार्थी यांना अधिका अधिक सेवा विद्यापीठाच्या उपकेंद्रावरच पुरविण्यात याव्यात असे आदेश दिलेले आहेत.

मा. कुलगुरूंच्या उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने शिक्षकांच्या आश्वासित प्रगती योजने (CAS) बाबतचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात यावे, असे प्रस्तावित आहे, त्यासाठी आपल्या महाविद्यालयातील आश्वासित प्रगती योजने (CAS) संदर्भातील (स्टेज-१ ते स्टेज-२, स्टेज-२ ते स्टेज-३, स्टेज-३ ते स्टेज-४ आणि स्टेज-४ ते स्टेज-५) पात्र शिक्षकांचे प्रस्ताव मागवून महाविद्यालयीन IQAC मार्फत API सह सर्व कागदपत्रे तपासून संपूर्णपणे पात्र असलेल्या शिक्षकांचे प्रस्ताव आपापल्या महाविद्यालयात स्विकारावेत. पात्रतेसाठी **दि. ३० एप्रिल, २०१८** ही **cutt-off date** तारीख गृहीत धरण्यात यावी, त्या अनुषंगाने पात्र शिक्षकांना महाविद्यालयामार्फत ऑनलाईन प्रक्रियेबाबतचे युजर आयडी व पासवर्ड प्रदान करण्यात यावे, यासाठी http://muonline.org.in या संकेतस्थळावर भेट दयावी व download section मधील guideline for CAS वाचून त्यातील सुचनांचे तंतोतंत पालन करावे.

ऑनलाईन अर्ज शिक्षकांनी स्वत: भरावयाचे आहेत. ऑनलाईन पध्दतीने सादर झालेले पात्र शिक्षकांचे अर्ज महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी संकेतस्थळावर पुन्हा एकदा तपासून खात्री करून घ्यावी व तद्नंतर विद्यापीठास ऑनलाईन पध्दतीने सादर करावेत. या प्रस्तावांची प्रिन्ट आऊट घेऊन स्वत:जवळ ठेवावी व विद्यापीठाच्या पुढील परिपत्रकात दिलेल्या शिबिराच्या वेळापत्रकानुसार व सुचनांनुसार कार्यवाही करावी. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यासाठी रूपये ४,९००/- प्रक्रिया शुल्क प्रती उमेदवार आकारण्यात येईल. आश्वासित प्रगती योजना (CAS) ची संपूर्ण प्रक्रिया जसे अर्ज स्विकृती, प्रक्रिया शुल्काचा भरणा, शिक्षक मान्यता पत्रे, इत्यादी यापुढे फक्त ऑनलाईन पध्दतीने करावयाचे असल्याने शिक्षकांना ऑनलाईन प्रक्रियेद्वारे अर्ज करणे आवश्यक आहे. यापुढे ऑफलाईन पध्दतीने अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. विहित केलेले प्रक्रिया शुल्क विना-परतावा (Non-refundable) अहस्तांतरणीय (Non-transferable) असल्यामुळे शिक्षकांनी आपण आश्वासित प्रगती योजनेच्या (CAS) संबंधित टप्प्यासाठी पात्र आहोत याची खात्री करूनच ऑनलाईन नोंदणी करावी. आश्वासित प्रगती योजनेच्या (CAS) कार्यवाहीसाठी दिनांक ३०/०४/२०१८ ही cut off date निश्चित करण्यात आली असून या मुदतीत पात्र होणाऱ्या शिक्षकांचे अर्ज दि. २०/०५/२०१८ पर्यंत स्विकारण्यात येतील.

# University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail - *dy.registrar.tau@fort.mu.ac.in*

**Teaching Appointments & Approval Section**
UNIVERSITY of MUMBAI,
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32



ऑनलाईन नोंदणीसाठी विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील **link** दिनांक ०३/०५/२०१८ पासून ते २०/०५/२०१८ पर्यंत सुरू राहील. पात्र शिक्षकांनी आश्वासित प्रगती योजनेच्या सर्व guidelines चे व्यवस्थितरीत्या वाचन करून मगच आपला अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावा. दिनांक ३०/०४/२०१८ नंतर पात्र होणाऱ्या शिक्षकांसाठी ऑनलाईन नोंदणीची तारीख स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

ऑनलाईन शिक्षक नियुक्ती व मान्यता व आश्वासित प्रगती योजने (CAS) बाबत मदतीसाठी संकेतस्थळावरील *"Contact Us"* टॅब मध्ये Helpline No. ( 077220 65283, 077220 65284 ) व ईमेल *support@muonline.org.in* देण्यात आले आहेत, त्यांची मदत घ्यावी. कृपया सदर परिपत्रकास महाविद्यालयाच्या सुचना फलकावर प्रदर्शित करावे तसेच याबाबत सर्व शिक्षकांना अवगत करण्यात यावे.

**( दत्ता घुगे )**
**उपकुलसचिव-टीएएएस**

प्रत :

१) मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे/संस्थाचे प्राचार्य/संस्थाचे सचिव/अध्यक्ष
२) कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
३) स्वीय सहाय्यक, प्र-कुलगुरू (प्रभारी), मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई -४०० ०३२.
४) स्वीय सहायक, कुलसचिव (प्रभारी), मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई -४०० ०३२.
५) प्रभारी संचालक, परीक्षा आणि मुल्यमापन मंडळ, परीक्षा भवन, सांताक्रुझ, मुंबई-९८.
६) वित्त आणि लेखा अधिकारी, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई -४०० ०३२.
७) संचालक, विद्यार्थी विकास विभाग.
८) संचालक, दूर आणि मुक्त शिक्षण संस्था, सांताक्रुझ, मुंबई-४०० ०९८.
९) जनसंपर्क अधिकारी, मुंबई विद्यापीठ, मुंबई – ४०० ०३२
१०) डॉ. ए. पी महाजन, सचिव, मुंबई विद्यापीठ महाविद्यालयीन प्राचार्य संघटना, द्वारा प्रगती महाविद्यालय, डोंबिवली, जिल्हा ठाणे- ४२१ २०१.
११) डॉ. टी. ए. शिवारे, अध्यक्ष, महाविद्यालयीन प्राचार्य संघटना द्वारा विलसन महाविद्यालय, चौपाटी, मुंबई ४०० ००७.
१२) बॉम्बे युनिवर्सिटी ॲन्ड कॉलेज टिचर्स युनियन, मुंबई विद्यापीठ क्लब हाऊस, बी रोड, चर्चगेट, मुंबई -४०० ०२०.
१३) मा. अध्यक्ष (UMASA),समाजशास्त्र विभाग, रानडे भवन, कलिना, मुंबई – ४०० ०९८.
१४) मा. अध्यक्ष मुप्ता (MUPTA)संघटना, १०३, गोराई, सम्राट अशोक को. हाऊ. सोसायटी, प्लॉट नं. १०२, गोराई – २, बोरिवली (पश्चिम), मुंबई- ४०० ०९१.
१५) मा. अध्यक्ष (MUCTA) खोली नं ४७, रानडे भवन, कलिना, मुंबई – ४०० ०९८.
१६) समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), सांताक्रुझ, मुंबई -४०० ०९८.
१७) अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१०प्रती).
१८) निर्मल सॉफ्टवेअर प्रायवेट लिमिटेड, मुंबई विद्यापीठ, रूम नं. २०१, फोर्ट, मुंबई – ३२.